नि.फौ.के.नं. ०३/२०२१

नि. क्र. ३८

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब**

नाव – स्वाती राजेंद्र यादव, वय– ५१ वर्षे,

व्यवसाय – प्राथमिक शिक्षीका, रा. चाफवली सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे</u> –**

०१. दि. ०२/०८/२०२० रोजी मी चाफवली येथे होते. माझ्या घरी माझे पती राजेंद्र यादव, मुलगा सिध्देश व रोशन तसेच लग्न झालेली मुलगी जान्हवी ही नातु वेदांत सोबत आमच्या सोबत राहते. मी सकाळी ०९.१५ च्या दरम्याने शाळेत जात असताना वाटेवर मला पोलिस पाटलांची गाडी दिसली. मला ती गाडी माझ्या आईच्या घराच्या पाठीमागे उभी असलेली दिसली. म्हणून मी माझी बहीण वेदीकाला फोन केला आणि तीला पोलिस पाटलांची गाडी तीथे का उभी आहे असे विचारले. ती मला म्हणाली की, 'तु घरी ये, काय तो प्रकार प्रत्यक्ष पहा'. माझी बहीण वेदीका माझ्या वडीलांच्या घरीच चाफवली येथे होते.

०२. मी, माझा मुलगा सिध्देश याला घेऊन वडीलांच्या घरी गेले. त्या ठिकाणी गावचे पोलिस पाटील विजय चाळके, माझी आई मालती, बहीण वेदीका, भाऊ रमाकांत, त्याची पत्नी पल्लवी, भाचा सागर त्याची पत्नी सानवी व गावचे ग्रामस्थ तिथे हजर होते. त्या ठिकाणी सरपंच अपर्णा कांबळे या देखील उपस्थीत होत्या. तिथे गेल्यानंतर मी त्यांना आईचे दागीने कुठे सापडले अशी विचारणा केली. तेव्हा वेदीकाने मला सांगीतले की, हे दागीने सागरने त्याच्या खोलीतून आणलेले आहेत.

०३.        माझ्या घरी कपाट नसल्याने माझे व आईने दिलेले तीचे दागीने असे वडीलांच्या घरी मी सुटकेसमध्ये ठेवले होते. ते दागीने वेदीकाच्या रुममध्ये ठेवलेले होते. मी माझे दागीने आहेत का, ते तपासण्यासाठी सुटकेस बघीतली असता मला माझे दागीने सापडले. मात्र आई वडीलांचे दागीने मिळून आले नाहीत. ती सुटकेस सर्व विस्कळीत केलेली होती. मी पोलिस  पाटलांना ते दागीने कुठे मिळाले याची विचारणा केली.

०४.        सागरने ते दागीने उचलून पोलिस स्टेशनला आणले. त्या दागीन्यांमध्ये एक चार तोळे वजनाचा सोन्याचा मध्ये खडे असलेला नेकलेस होता, एक वाघनख असलेला सोन्याचा गोफ होता, तीन तोळे वजनाच्या तीन सोन्याच्या अंगठ्या होत्या, एक तोळे वजनाची एक सोन्याची बांगडी होती. त्या सुटकेसमध्ये काही महत्वाची कागदपत्रे ठेवलेली होती मात्र ती मिळून आली नाहीत. मी चोरीची तक्रार दाखल करणार म्हणून त्याआधीच सानवी व सागर यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद नोंद केली. साक्षीदाराला आता न्यायालयात हजर करण्यात आलेला चार तोळे वजनाचा मध्यभागी खडे असलेला नेकलेस दाखवण्यात आला. हा तोच नेकलेस आहे. (सदरचा मुद्देमाल फौ.कि.अर्ज क्र. १५०/२०२० अन्वये दि. ११/११/२०२१ रोजी अर्जदार मालती जाधव यांच्या ताब्यात अंतरीम ताबा म्हणून देण्यात आलेला आहे. आजरोजी तो न्यायालयात अर्जदारातर्फेच हजर करण्यात आला.) नेकलेसला **आर्टीकल 'अ'** देण्यात येते. मला आता दाखवलेले वाघनख पेन्डट असलेले सोन्याचा गोफ तोच आहे. त्याला **आर्टीकल 'ब'** देण्यात येते. मला आता दाखवलेले तीन, तीन तोळ्याच्या सोन्याच्या अंगठ्या त्याच आहेत. अंगठ्यांना एकत्रीत **आर्टीकल 'क'** देण्यात येते. मला दाखवलेली एक तोळा वजनाची सोन्याची बांगडी तीच आहे. बांगडीला **आर्टीकल 'ड'** देण्यात येते.

०५. मी देवरुख पोलीस ठाण्यात सागर जाधव, सानवी जाधव, शशिकांत जाधव यांच्या विरुध्द माझ्या आईचे दागीने चोरुन नेल्याबाबत फिर्याद दाखल केली. मला आता दाखवलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.३९** देण्यात येते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे –**

०६. हे म्हणणे खरे आहे की, चाफवली मधून साखरपा दुरक्षेत्र येथे वाहनाने जायचे झाल्यास साधारण अध्र्या तासाचा अवधी जातो. मी गेली ३० वर्षे शिक्षीका म्हणून काम करते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे शैक्षणिक दृष्टीकोनातुन अनेक ऑफीसमध्ये येणे जाणे असते. पोलिस स्टेशनला मी दुपारी गेले होते. रात्री १०.०० पर्यंत मी देवरुख पोलिस स्टेशनला होते. मी तथाकथीत घटनेच्या वेळी करंजारी येथे शिक्षीका होते.

०७. मी तथाकथीत फिर्याद दिल्यानंतर दुस–या दिवशी शाळेत हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/०८/२०२० रोजी रविवार असल्याने शाळेला सुट्टी होती.हे म्हणणे खरे आहे की, चाफवली येथे माझे स्वतःचे घर आहे. मला सन २०२० मध्ये कीती पगार होता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती पंचायत समितीमध्ये नोकरीला होते. हे म्हणणे खरे आहे की, रत्नागिरी कारवांची वाडी येथे माझे स्वतःचे स्लॅबचे घर होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे माझी बहीण वेदीका, भाऊ रमाकांत, त्याची पत्नी व आई यांच्याशी चांगले संबंध आहेत.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सागर चे वडील मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सागरला एक भाऊ आणि बहीण आहे. हे म्हणणे खरे आहे की, सागरची आई ती भावंडे लहान असतानाच घरातून बाहेर पडली. हे म्हणणे खरे आहे की,

माझ्या वडीलांनी सागरचा व त्याच्या बहीणीचा न्यायालयामार्फत कायदेशीर ताबा घेतला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सागर आणि त्याची बहीण यांचा सांभाळ माझ्या आई वडीलांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे एकाच घरात त्यावेळी माझी बहीण वेदीका देखील राहत असते.

०९. हे मला माहीती नाही की, दि. १०/१०/२०१९ रोजी सागरच्या अंगावर गरम पाणी ओतुन वेदीकाने त्याला दुखापत पोहोचवली होती. हे मला माहीती नाही की, दि. १६/०७/२०२० रोजी सागरने मी, माझी बहीण वेदीका तसेच माझा भाऊ रमाकांत यांनी उकळते पाणी अंगावर ओतून त्याला दुखापत पोहोचवल्याबाबत त्याला वरचेवर शिवीगाळ करुन धमकी दिल्याबाबत पोलीस निरीक्ष देवरुख पो.ठाणे व पो.अधिक्षक, रत्नागिरी मुख्यालय यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला होता.

१०. सन १९९४ मध्ये माझे लग्न झाले. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र यादव माझे पती व शशिकांत यादव माझे दीर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती व दिराविरुध्द मी देवरुख पोलिस ठाण्यात भा.द.वि.का.कलम ४९८ अ अन्वये फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या फिर्यादीमध्ये मी माझ्या पती विरुध्द रककम रु. ८५००/– माझ्या पर्समधुन चोरल्याबाबत आरोप लावले होते. हे मला आठवत नाही त्या केसमधून त्यांची निर्दोष मुक्तता झाली. हे मला आठवत नाही की, माझी त्या केसमध्ये साक्ष झाली होती.

११. हे मला आठवत नाही की, सन २००२ मध्ये मी कुठे नोकरी करत होते. माझे लग्नापुर्वीचे नाव सुरेखा मारुती जाधव आहे. हे मला आठवत नाही की, २००२ मध्ये मी देवळे येथे प्राथमिक उपशिक्षीका म्हणून काम करत होते.

१२. गेली अनेक वर्षापासून तुमचे शशिकांत जाधव यांच्याशी बोलाचाली नाही यावर माझे म्हणणे की, तक्रार दाखल झाल्यानंतर बोलाचाली बंद आहे. हे मला माहीती नाही की, शशिकांत जाधव सागर जाधव यांना कोणत्याही अडीअडचणीच्या

काळात मदत करतात. हे म्हणणे खरे आहे की, शशिकांत जाधव गेली अनेक वर्षापासून लांजा येथे राहतात. हे मला माहीती नाही की, ते लांजा येथे नोकरीला असून त्यांन तिथे घर देखील बांधले आहे. चाफवली येथून माझ्या घरापासून आईचे घर १० ते १५ मिनीटांच्या अंतरावर आहे. सन २००८ साली मी चाफवली येथे घर बांधले. सन २०१९ मध्ये कारवांची वाडी येथे आम्ही घर बांधले. कारवांचीवाडी येथील आमचे घर पाच ते सहा खोल्यांचे आहे.

१३. वेदीका यादव चाफवली येथील घरात वेगळी राहत होती. माझी आई, सागर आणि त्याची पत्नी एकत्र राहत होते. हे मला माहिती नाही की वेदीका रहात असलेल्या खोलीचा ताबा तिच्याकडेच असायचा. हे म्हणणे खरे नाही की चाफवली येथील माझ्या आईच्या घरचा माळा बंदीस्त नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे दागिने माझ्या आईच्या मालकीचे असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे मला माहीत नाही की दि.२९/०७/२०२० रोजी सागर त्यांच्या पत्नीसोबत तिच्या माहेरी गेला होता. हे मला माहिती नाही की दि. ०१/०८/२०२० रोजी तो चाफवली येथे पत्नीसह माघारी आला. हे मला माहिती नाही की साफसफाई करुन झाल्यानंतर सागरने बसण्याकरीता चटई काढली असता त्यातून काहीतरी खाली पडल्याचा त्याला आवाज आला. हे मला माहिती नाही की ती एक डबी होती व त्या डबीमध्ये त्याने पाहिले असता सोन्याचे दागिने आढळून आले.

१४. हे मला माहिती नाही की ते दागिने आढळल्यानंतर गावचे पोलीस पाटील चाळके यांना फोन करुन त्या गोष्टीची कल्पना दिली. हे मला माहिती नाही की पोलीस पाटीलांनी त्यांना त्या दिवशी दागिने तसेच ठेव मी दुस–या दिवशी येतो असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की,पोलीस पाटीलासमक्ष ती डबी व दागिने कोणाचे आहेत अशी विचारणा सागरने पोलीस पाटलांसमोर केली. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी वेदीका यादव देखील तिथे हजर होती. हे म्हणणे खरे नाही की,मी तिथे

असताना अशी विचारणा झाली होती. हे म्हणणे खरे नाही की,माझ्या समक्ष पोलीस पाटीलांनी हे दागिने आणखी दागिने चोरीला गेले असल्यास त्याचा तपास पोलीस करतील सबब आता ते दागिने पोलीस स्टेशनला जमा करण्याचा सागरला सल्ला दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष त्याने त्यांच्या सल्लानुसार दागिने पोलीस स्टेशनला निले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रमाकांत जाधव यांची पत्नी पल्लवी जाधव हिने सागरला तुम्ही चोर आहात असे बोलत शिवीगाळ करायला सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी वेदीका यादव हिने सागरच्या पत्नीला, "तू वेश्या आहेस तुला कोणीही २०० रुपये दिलेस तर तु खुश होतेस",असे म्हणाली. हे म्हणणे खरे नाही की,त्यावेळी रमाकांत जाधव यांनी सागरच्या पत्नीला "तुला एवढीच पैशाची गरज असेल तर तु माझ्या शेजारी झोप" अशी अश्लील शिवीगाळ केली.

१५. हे म्हणणे खरे आहे की,आमच्या विरुध्द सागरच्या पत्नीने देवरुख पोलीस ठाण्यात त्याच दिवशी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या विरुध्द तक्रार दाखल केल्याने चिडून आरोपीविरुध्द ही खोटी फिर्याद आम्ही दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे फिर्याद दिल्यानंतर पोलीसांचा माझ्याशी काही संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की,दि. १५/०७/२०२० ते दि. ०२/०८/२०२० या दरम्याने माझी बहीण वेदीका हिने स्वतःहून देवरुख पोलीस ठाण्यात फिर्याद दिलेली नाही. माझा जबाब पोलीसांनी माझ्या सांगण्यानुसार नोंदविला होता. माझ्या सरतपासातील मजकूर की मी पोलिस पाटलांना ते दागीने कुठे मिळाले याची विचारणा केली. त्या सुटकेसमध्ये काही महत्वाची कागदपत्रे ठेवलेली होती मात्र ती मिळून आली नाहीत. हा मी माझा फिर्यादी जबाब देतेवेळी पोलीसांना सांगितला होता. तो तसा माझ्या फिर्यादीत नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी विरुध्दखोटी फिर्याद दिलेली आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/–**

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १२/०२/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**